
म. ग्रं. सं. ठाणे
विषय प्रवास
सं. क्र. 2460
9660

# अगस्त्याचें संस्कृति-केंद्र



मराठवाडा-विदर्भ परिसर

REFBK 0011403
REFBK-0011403



सन १९६०

सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन-

# अगस्त्याचें संस्कृति-केंद्र

## सालबर्डी

महान् आर्य धर्म-संस्कृति प्रचारक महर्षि अगस्ति यांनीं उत्तरेंतून दक्षिणपथांत आर्यांचा पहिला प्रवेश केला तो या मार्गानें. उत्तर-दक्षिणेचें मीलन या स्थळानें घडवून आणलें हें याचें वैशिष्ट्य.

२५३०५ अगरवाल

प्रा. भाऊ मांडवकर

२२/११/६०
२५.०

किंमत
६५
नये पैसे

REFBK-0011403
११८०३



वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री : २४५

© १ ९ ६ ०

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रा. लि. मुंबई २.

*

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शनमाला : ३०
...विदर्भ परिसर

*

आवृत्ति पहिली : १९६०

*

किंमत ६५ नये पैसे

*

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य बोलकीं शब्दचित्रें

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

*

मुद्रक :
ज. ग. जोशी,
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २.

# विदर्भाचें संस्कृति-वैभव

महाराष्ट्राच्या घटकप्रदेशांतील विदर्भ-भूमि अत्यंत प्राचीन आहे. उपनिषत्कालापासून विदर्भाचे गौरवोल्लेख आढळतात. नर्मदा आणि कृष्णा या नद्यांच्या मधल्या प्रदेशांत विदर्भानें प्राचीन काळीं आपला सांस्कृतिक प्रभाव पाडला होता. महर्षि अगस्त्यांच्या तपस्तेजानें उजळून निघालेली लोपामुद्रा, भगवान् श्रीकृष्णाचें हृदय जिंकणारी रुक्मिणी आणि पुण्यश्लोक नलराजासाठीं वनवास पत्करणारी दमयन्ती या विदर्भभूमीच्याच कन्या.

इतिहास-काळांत सातवाहन, वाकाटक, कलचूरी, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या सर्व प्रसिद्ध राजकुलांनीं विदर्भाची गौरवशाली परंपरा वर्धिष्णु बनविली. वाकाटकांच्या काळांत तर विदर्भभूमि संस्कृति-वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होती. गुप्तवाकाटकांनीं भारतीय इतिहासाचें सुवर्णयुग घडविलें—त्या वाकाटकांची राजधानी विदर्भात नंदिवर्धन (नगरधन) येथें होती. राज्यकर्तृत्व, धर्म, साहित्य आणि कला या संस्कृतीच्या सर्व अंगाचें विदर्भानें पोषण केलें आहे.

'वैदर्भी रीति' विदर्भाच्या मातींतूनच फुललेली आहे. महाकवि भवभूति हा विदर्भाचाच पुत्र. महानुभावपंथसंस्थापक चक्रधरांचे गुरु गुंडम राऊळ, आदिकवि मुकुंदराज, द्वितीय दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती हे मूळचे विदर्भातीलच.

— श्रीरामाच्या पाऊलखुणा उरीं सांठविणारें रामटेक, रुक्मिणी-स्वयंवराच्या मधुर स्मृतींत रंगणारी अमरावती, जैनांच्या परंपरेची जपणूक करणारा मुक्तागिरि, महाकालीची उपासना करणारें चंद्रपूर, श्रीगणेशाच्या आराधनेंत मग्न असणारीं आधाशा आणि कळंब हीं स्थानें, विदर्भपंढरी कौंडिण्यपूर आणि आधुनिक सन्त श्रीगजाननमहाराज यांचें शेगांव या विदर्भांतील कांहीं संस्कृति-केंद्रांचा परिचय या मालेंतून करून दिला जात आहे.

२७३८५ २५.७ २२।११।५ ११८०३

# अगस्त्यांचें संस्कृति-केंद्र

## सा ळ व णीं

### अगस्त्य-आश्रम :

प्राचीन काळीं उत्तरेकडे बरीचशी स्थिरस्थावर परिस्थिति असतांना दक्षिणेकडे घनदाट अरण्य सर्वत्र पसरलें होतें. भारताची दक्षिण आणि उत्तर अशीं दोन शकलें विंध्याद्रीमुळें पडलीं होतीं. उत्तुंग विंध्य पर्वतानें दक्षिणेचा मार्ग अडवून धरला होता. दक्षिणेंत उत्तरेकडून येण्याला सुगम असा मार्गच उपलब्ध नव्हता. विंध्यगिरीच्या दक्षिण भागीं दंडकारण्य होतें. त्या अरण्यभागांत वन्य पशु आणि वन्य जमाती यांचाच निवास होता.

दक्षिण आणि उत्तर यांची ही फारकत नष्ट करणाऱ्या आर्य मिशनरी ऋषींचे प्रयत्न लाख मोलाचे म्हणावे लागतील. उत्तर-दक्षिण हा भेद मिटविणारे ते महाभाग धन्य होत ! सर्वप्रथम दक्षिणेत येऊन कार्य करणारी व्यक्ति तर भारतीयांच्या अत्यादरास आणखीच पात्र ठरल्यावांचून रहात नाहीं. विंध्याद्रीमधून बिकट वाट काढणारे आणि दक्षिणेंत आर्य संस्कृतीचें लोण पोहोंचविणारे पहिले महान ऋषि अगस्त्य हे होत. अगस्त्य मुनींनीं वाढत्या विंध्याला सांगितलें, " वाढूं नकोस, चढूं नकोस. गर्वोन्मत्त होऊं नकोस. नम्र हो. " पर्वतानें मुनींचा मान राखला. तो नम्र झाला. कमी उंच भाग जेथें गवसला तेथून अगस्तींनीं वाट काढली. ज्ञान-ऋषि अशा अगस्त्यांना

कृषिऋषि पण म्हणतात. हातांतील कुदळी चालवून श्रमशक्तीनें विंध्य-सातपुड्यांतून अगस्त्यांनीं दक्षिणपथ मोकळा केला आणि दक्षिणेकडे वस्ती केली. आर्यांचें आगमन इकडे प्रथम त्यांच्या-पासूनच झालें. उत्तर-दक्षिणभेदाची भावना मिटविण्यासाठीं त्यांनीं स्वतः सक्रिय धोरण ठेवलें. विदर्भांतील लोपामुद्रा नामक युवतीशीं लग्न करून त्यांनीं आंतरप्रांतीय विवाहप्रथा पाडली व भेदनिर्मूलनाचें फार मोठें उदाहरण घालून दिलें. अगस्त्यांनीं विदर्भानंतर आर्य धर्मप्रचाराची मोहीम आंध्र, तमिळ भागांत सुरू केली. ते कन्याकुमारीपर्यंत जाऊन पोहोंचले. समुद्र पार करण्याचीहि कामगिरी त्यांनीं केली.

दक्षिणेकडील या महान धर्मकार्याचा आरंभ सालबर्डी येथून झाला. अगस्ति जेव्हां कठीण गिरिशिखरें ओलांडून दक्षिण उतरणीवर आले असतील, तेव्हां त्यांना कोण आनंद झाला असेल ! राष्ट्रैक्याची मनोमन कामना करणाऱ्या त्या 'महा-भागाला' त्या क्षणीं कृतकृत्य वाटलें असेल. संपलेला बिकट घाट आणि काळ्या मातीवर वाढलेल्या जंगलांचा सपाट थाट पाहून त्यांना आपण क्षितिजस्थानीं असल्यासारखें भासलें असेल. पृथ्वी-आकाशाचें मीलन व्हावें, तसें उत्तर-दक्षिणेचें मीलन आतां व्हावयाचें आहे, याचा असीम आनंद झालेल्या अगस्त्यांना शिष्यवर शैलाचें शेवटचें दर्शन घेतांना थोडा वेळ विश्राम करावासा वाटणें साहजिक आहे. रम्य स्थान पाहून ते तेथें विसांवले असणारच.

हें रम्य स्थान म्हणजेच सालबर्डीची गिरिमाला. पूर्वी सातपुड्याला विंध्य म्हणत असत. उत्तरेकडून संपणारा सात-पुडा म्हणजेच विंध्याद्रि आणि दक्षिणेकडे सपाट पट्टा अशा मीलनरेषेवर त्यांनीं कांहीं काळ निवास केला. दक्षिणेकडे जाऊन कार्य करण्यासाठीं रूपरेषा आखली पाहिजे. कांहीं दिवस मनन-चिंतन केलें पाहिजे. अर्थात् त्यासाठीं निवडलेलें निवास-स्थान निसर्गरम्य स्थानीं असलें पाहिजे असा विचार करून

अगस्त्यमुनींनीं सालबर्डीची त्यासाठीं निवड केली. हत्तीप्रमाणें विशाल शिलाखंड पसरलेल्या आणि हत्तीसारख्या काळ्या कुळकुळीत पण भव्य देहाच्या गिरिखंडांना पाहून भारतैक्य साधण्याचे विशाल विचार बाळगणारे अगस्त्य सालबर्डीस विसांवण्यासाठीं आश्रम बांधून राहिले. हा आश्रम कुंजर पर्वतावर होता. कुंजर हें नांव या पर्वतास अगस्त्यांनीं दिलें असावें.

अगस्त्य मुनींनीं नंतर दक्षिणभागीं आर्य संस्कृति व आर्य धर्म यांचा प्रचार अधिक केला. त्यांना कार्यक्षेत्र मिळालें अनुकूलताहि लाभली. ते नंतर जेथें जेथें गेले, तेथें तेथें आश्रमांची स्थापना करून ते कार्य करीत राहिले. विशेषतः मद्रासभागांत त्यांनीं केलेल्या प्रचारकार्यास तोड नाहीं. कूर्गप्रदेशांत ब्रह्मगिरी, आंध्रांत द्राक्षारामम्, तंजावर जिल्ह्यांत अगस्त्यम्पल्ली आणि तिरुनेवेल्ली जिल्ह्यांत पोदियमल्लै व अगस्त्यवरम् हीं अगस्त्यसंबंधीं क्षेत्रें प्रख्यात आहेत. महत्त्वाचा व मोठा असा आश्रम पोदियमल्लै येथें आहे. तमिळ भाषेचें व्याकरण अगस्त्यांनीं याच आश्रमांत लिहिलें. या आश्रमांतून त्यांनीं आर्य संस्कृतीचा फार मोठा प्रचार केला. तमिळ भाषेवर ते व्हांपासून संस्कृतचा पगडा बसला.



महामुनी अगस्ति

अगस्त्यांना अनेक शिष्य लाभले. पुढें अशा तऱ्हेच्या धर्म-प्रचारकार्यासाठीं अगस्त्य हें नांव धारण करणाऱ्यांचा एक वर्गच तयार झाला.

## आर्य धर्माचें प्रथम प्रचार-केंद्र :

दक्षिणेंतील या एवढचा महान कार्याचा आरंभ ज्या जागीं झाला, त्या सालबर्डीचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. दक्षिणेंतील अनेक आश्रमांची प्रेरणा आणि धारणा सालबर्डीच्या कुंजर पर्वतावरील, दक्षिण भागांतील पहिल्या अगस्त्य-आश्रमांत घटित झाली, ही गोष्ट महत्त्वाची आहे. सालबर्डी स्थानाचें हें सांस्कृतिक ऐक्याचें सर्वश्रेष्ठ आणि सर्वप्रथम श्रेय हिरावून घेतां येणार नाहीं.

दक्षिणेंतील सर्वांत जुना वसति-भाग विदर्भ हाच असून दंडकारण्य असें नांव त्यावेळीं या प्रदेशाला होतें. म्हटलेंच आहे—

"दण्डकारण्ये देशे गोदावर्याः उत्तरे तीरे।"

विंध्य-सातपुडयाच्या पूर्वभागांतून आर्यांचें आगमन विदर्भभूमींत झालें. ह्या आगमनाचा रस्ता सालबर्डीजवळून होता. अगस्त्य ऋषीनंतर मोकळया झालेल्या वाटेनें आर्य इकडे येत राहिले. त्यामुळें सांस्कृतिक ऐक्याचें कार्य अबाधित व अखंड असें होत गेलें. हें कार्य विदर्भाच्या पूर्वभागांत, वरदा नदीच्या अवतींभवतीं, सालबर्डीच्या जवळपास झालें. विदर्भांतील अतिप्राचीन पवित्र स्थळें याच परिसरांत आहेत, यावरून या विधानाची सत्यता पटते. कारण विदर्भांतील अतिप्राचीन अशीं सर्व पवित्र स्थळें वरदातटाकीं सालबर्डीहून दक्षिणेकडे सरळ जात असतांना लागतात. अगस्त्यांच्या आश्रमाची सालबर्डी, विदर्भाची राजधानी कुंडिनपूर, पयोष्णीकांठचीं तीर्थें, देऊरवाडा, भोजकट, भांदक, मार्कंडेय हीं सर्व स्थानें अतिप्राचीन असून सालबर्डीनंतरचीं आर्यांचीं वसतिस्थानें होतीं. विदर्भांत विदर्भ राजाचें राज्य स्थापित झालें, तेंहि याच वरदा-परिसरांतच, हें लक्षांत घ्यायला हवें. विदर्भांतील यादव हे भोजांपैकीं होते. हा विदर्भाचा प्रसिद्ध व प्रथम राजवंश होय. विदर्भ राजाच्या पित्याचें नांवच मुळीं यादव असें होतें.

विदर्भातील आर्यांचा हा पसारा वाढण्यासाठीं अगस्त्य-मुनींची शिष्यपरंपराहि प्रथमारंभीं बव्हंश कारण झाली. कुंजरगिरीवरील आश्रमांत असतांना अगस्त्यांनीं क्षत्रिय शिष्यांना अनार्यांत करावयाच्या प्रेम-धर्म-शिक्षणाची दीक्षा दिली आणि नंतर दक्षिणप्रदेशांतील सर्व बाजूंस वसाहत वाढविण्यासाठीं व आर्य धर्मप्रसारासाठीं त्या सर्व शिष्यांना रवाना केलें.

श्रीरामचंद्रापूर्वीं सुमारें वीस पिढ्या अगोदर झालेलें हें प्रचारकार्य असून त्या कार्याचें आद्यकेंद्र कुंजरगिरीवरील सालबर्डी येथें होतें. हें स्थळ निवडण्यांत अगस्त्यांनीं औचित्य दाखविलें, असेंच म्हणावें लागेल. कारण अमाप सृष्टिसौंदर्य व मनोरम परिसर असलेलें हें स्थान आजहि आश्रमाच्या अस्तित्वासाठीं अगदीं योग्य असें आहे.

प्रत्यक्ष प्रभु रामचंद्रांनीं सुद्धां अगस्तींच्या या आर्य धर्म-प्रचार कार्याची प्रशंसा करून त्यांना गौरविल्याचा उल्लेख रामायणांत आहे.

## महाकवि वाल्मीकींचा आश्रम :

महाकवि वाल्मीकि यांचा आश्रम सालबर्डीला होता, अशी जनश्रुति परंपरेनें चालत आलेली आहे. ती सर्वतोमुखीं आहे. अगस्त्यांच्या ऐवजीं वाल्मीकीचें नांव लोकांच्या तोंडीं बसणें सुलभ गेलें असणें शक्य आहे. वाल्मीकि आणि त्यांची रामकथा जनजिव्हाग्रीं अधिक असल्यामुळेंहि हा विपर्यय झाला असावा. वाल्मीकींचा आश्रम आणि तदनुषंगिक कांहीं बाबी येथें खात्रीनें होऊन गेल्याचा निर्वाळा या भागांतील लोक स्थळें आणि खाणाखुणा दाखवून आजवर देत आले आहेत. या श्रद्धेला अजूनहि तडा गेलेला नाहीं.

परंतु, वाल्मीकींचा आश्रम येथें नसेलच असेंहि म्हणतां येणार नाहीं. पूर्वींच्या काळीं महापुरुष आपल्या कार्याचीं प्रचारस्थळें भिन्न भिन्न प्रदेशांत निर्माण करीत असत. आजहि

ही परंपरा खंडित झालेली नाहीं. अगस्त्यांच्या जागोजागच्या अनेक आश्रमांप्रमाणें आज श्रीरामकृष्ण आश्रम आहेत. साबरमती व सेवाग्राम येथील गांधीजींचे आश्रम आणि विदर्भ, मध्यप्रदेश, बिहार, मराठवाडा या भागांतील तुकडोजी महाराजांचे सेवाश्रम हीं आजचीं उदाहरणें आहेत. तेव्हां सालबर्डीला वाल्मीकींचा असा एखादा आश्रम अस्तित्वांत नसेल, असें निखालस म्हणतां यावयाचें नाहीं.

वाल्मीकींचें पूर्वजीवन वाटमारी करण्यांत गेलें. पापांचे अनेक धडे भरत असतांना नारदांची भेट होऊन त्यांचें हृदय-परिवर्तन झालें. नारदांनीं दिलेल्या मंत्राचा जप वाल्मीकींनीं सुरू केला. जप करतां करतां वाल्मीकि देहभान विसरले. अरण्यांत सुरू केलेल्या त्या तपश्चर्येची परिसीमा झाली. वाल्मीकींच्या अंगावर वारुळाची माती चढली. त्या ढिगाऱ्यांत मुनिवर्य ध्यानस्थ बसले.

नारदांनीं या ध्यानयोगाची समाप्ति केली. फिरत फिरत ते सालबर्डी-भागांत आले. त्यांना वाल्मीकींची ही महान तपश्चर्या पाहून धन्यता वाटली. त्यांनीं वाल्मीकींना त्या वारुळांतून बाहेर काढलें.

तदनंतर वाल्मीकींचें ऋषिजीवन सुरू झालें. त्यांनीं तेथें एक आश्रम बांधला. त्या आश्रमांत जीवन व्यतीत करीत असतांना क्रौंच पक्ष्यांचें जोडपें बघून वाल्मीकींना रामायणाची स्फूर्ति झाली. जगाला एक महाकाव्य मिळालें.

### लव आणि कुश यांचें जन्मस्थान :

काळानें परिवर्तनें पाहिलीं. रामाचा वनवास संपला. रामराज्य सुरू झालें. अग्निदिव्य करूनहि सीतेच्या चारित्र्याबद्दल लोकांनीं शंका घेतल्या. जनरूढीपायीं सीतेसारख्या साध्वीला बळी पडावें लागलें. गरोदर असतांना सीतेला लक्ष्मणानें

गंगातटावर आणून सोडलें आणि ऐनवेळीं तिचा रामानें त्याग केला असल्याची तिला माहिती दिली. सीतेवर कुऱ्हाड कोसळली. लक्ष्मण परत गेला. जवळ कुणी नाहीं. अरण्यांत कुणाला शोधायचें ? तरुण स्त्रीला कोण आश्रय देणार ? अनाथांचें पालन करण्यासाठीं, रंजल्यागांजल्यांची सेवा करण्यासाठीं सत्सेवेच्या प्रचारासाठीं निर्माण झालेले आश्रम आणि त्यांचे पितृतुल्य चालक यांचाच एकमेव आसरा त्याकाळीं अशा परिस्थितींत घेणें जवळचें पडत असे. सीतेलाहि असाच आसरा मिळाला. आपलें उर्वरित दुःखी आयुष्य, पोटांतील गर्भाला जिवंत ठेवण्यासाठीं म्हणून सीतेनें वाल्मीकींच्या सालबर्डी–आश्रमांत घालविण्यास सुरुवात केली.

सीतेचा हा अज्ञातवास चालू असतांनाच लव आणि कुश या जुळ्या बालकांना तिनें जन्म दिला. वाल्मीकींनीं त्यांना सर्व तऱ्हेचें शिक्षण दिलें. वनराजी हिंडून या बाळांनीं निर्भयतेचे धडे घेतले. धनुर्विद्येंत हीं मुलें प्रवीण झालीं. रानांतील वारा पिऊन आणि वाल्मीकि गुरूंच्या आशीर्वादाचें पाठबळ घेऊन वाढलेल्या लव-कुशांनीं श्रीरामचंद्राच्या श्यामकर्ण वारूला अडविलें. श्रीरामचंद्रांनीं यज्ञाच्या निमित्तानें विश्वविजयी म्हणविण्यासाठीं श्यामकर्ण घोडा सोडला व तो त्यांच्याच मुलांनीं अडवून शौर्यतेज दाखविलें.

### सालबर्डीला राम-सीतेचें पुनर्मीलन :

श्यामकर्ण अडवून तो परत देण्यास या मुलांनीं नकार दिला. तेव्हां राम, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न यांना या छबकड्यांशीं युद्ध करण्यासाठीं उभें रहावें लागलें. या धुमश्चक्रींत लव आणि कुश यांचा विजय झाला आणि अस्त्रयोगें श्रीरामचंद्र व त्यांचे तिघे भाऊ बेशुद्ध पडले. त्या अवस्थेंत त्यांच्या अंगावरील अलंकार लव आणि कुश यांनीं आईला दाखवायला आणले. आईनें ते अलंकार ओळखले. वाल्मीकींनीं ते परत देऊन

राम-सीतेचें पुनर्मीलन घडवून आणलें. उभयतांनीं एकमेकांना ओळखलें व मायेच्या कंठांनीं शिपलेल्या अश्रु-सड्यांनीं पृथ्वीला न्हाऊन टाकलें !

**सीतेची नहाणी :**

राम-सीतेचें दंडकारण्यांतील हें पुनर्मीलन गंगातीरीं सालबर्डीस झालें, ही गोष्ट इकडे आदरानें सांगितली जाते. वऱ्हाडच्या ईशान्य टोकावरील सातपुड्याच्या डोंगरांमधून उगम पावलेल्या गंगा नामक अगदींच छोट्या नदीच्या कांठीं वाल्मीकींचा आश्रम होता, असें म्हणतात. या गंगेच्या उगम-स्थानीं 'तातोबाची मढी' म्हणून एक प्राचीन देवालय आहे. त्यालाच सीता-तात वाल्मीकि यांचा आश्रम असें म्हणतात. येथें किंवा जवळपास आश्रमाची रचना असूं शकेल, हें मात्र खरें.

पूर्वतीरावरील या देवळाच्या पश्चिमेस लागूनच खोलगट सरिता-भाग असून पश्चिम कडेला एक कपार आहे. या कपारी-वर डोंगरी कडा असून या ठिकाणीं कड्याकपारीच्या भिंतीं-तून पाणी गळत असतें. पावसाळ्यांत तर इथलें दृश्य छोट्याशा धबधब्यासारखें दिसतें. हाच सालबर्डीच्या पवित्र गंगेचा उगम असून या कड्याखालीं एक हौदवजा खळगा तयार झाला आहे. हा जलाशय बाराहि महिने पाण्यानें तुडुंबलेला असतो. दुष्काळ असला तरीहि हा जलाशय आणि त्यावर जगणारी गंगामाई कधींच सुकत नाहीं. शंकराच्या जटेंतून निघालेली गंगा कधीं आटत नाहीं; हीहि गंगाच! भारतांतील इवलासा ओहळसुद्धां गंगा म्हणवितो. साल-गंगेला तर बारा महिने तेरा काळ पाणी असतें. प्राचीनकाळापासून ती कधींच सुकली नाहीं. मग ती शंकराच्या जटेंतील प्रिय गंगा कां म्हणविली जाऊं नये ? तसें तिच्यांत फारसें पाणी दिसत नाहीं. या तीरावरून त्या तीरावर उडी मारून आपण उन्हाळ्यांतच काय, कोणत्याहि ऋतूंत सहज जाऊं शकूं. ही गंगा इकडील कोरकू व गोंड लोकांची

माई आहे. तीवर बसून वा निजून झाडाखालीं मंडळी विसांवलेली दिसतील ! एखादा शिकलासवरला गृहस्थ आला कीं त्याला ही मंडळी गंगेकाठीं बसवून गंगामाईचे गोडवे ऐकवीत रहातील. गंगा मात्र आपल्याच नादांत झुळझुळ वहात असेल.



शहरी माणूस भेटल्यास कोरकू लोक विसांवून गंगेवर बसून गंगेचें माहात्म्य सांगतात.

'तातोबाच्या मढी'जवळील जलाशय 'सीतेची नहाणी' म्हणून प्रसिद्ध आहे. या जागीं सीतामाई अज्ञातावस्थेंत असतांना स्नान करीत असे, असें सांगतात. या 'नहाणी'चें वैशिष्टय हें कीं या जागीं गरम व थंड पाण्याचे झरे जवळजवळ आढळून येतात. ह्या झऱ्यांचीं दोन कुंडें येथें आहेत. त्यांनाच 'सीता-नहाणी' हें लोकनाम आहे. ही नहाणी वाल्मीकींच्या आश्रमांत सीता होती तेव्हांची आहे असें म्हटलें जातें. येथील गरम-थंड झरे आजहि अखंड वहातात. ते एखाद्या कारंज्याप्रमाणें बुडबुडत उफाळचा घेत असतात. अलीकडे मात्र हे झरे गरम-थंडपणाचा भेद विसरून अभेदाचा धडा देऊं लागले आहेत. कांहीं दिवसांपूर्वीची ही विलगता अनुभवणारी मंडळी आजहि जिवंत आहेत. कदाचित् या जलाशयांत माती वगैरे सांचल्यामुळें झऱ्यांचीं तोंडें बुजलीं, म्हणूनहि हा फरक कमी झाला असावा. हे दोन विभाग अलग दाखविण्यासाठीं एकमेकांच्या लगत दोन टाकीं तयार करण्याचा प्रयत्न मागाहून कोणीतरी केला आहे.

सीतेच्या नहाणीजवळचा भाग थंड, शीतल, सावली असलेला, अजानवृक्षवेष्टित व मनोरम असा आहे. उंच अशा तातोबाच्या मढींतून सीता नहाणीकडे तासन् तास पहात बसावेंसें वाटतें.

गरम व थंड पाण्याचे झरे तसें पाहिलें तर एका लहान खडकांतून वर येतात. कांहीं वर्षांपूर्वी या तिन्ही झऱ्यांतील पाण्याच्या संशोधनाअंतीं असें आढळून आलें कीं, गंधकासारखीं कांहीं द्रव्यें त्या पाण्यांत आहेत. त्या डोंगरांत अशीं कांहीं द्रव्यें असावींत, असें दिसतें, या द्रव्यांनीं युक्त असें तें झऱ्याचें पाणी पिण्यास मात्र तितकेंसें योग्य नसल्याचा निर्वाळा संशोधकांनीं दिलेला असला तरी कांहीं चर्मरोग नष्ट करण्यासाठीं त्या पाण्याचा अगत्यानें उपयोग होऊं शकतो, असें मात्र त्यांनीं सुचविलें आहे. त्यांतील पाण्यानें स्नान केल्यास चर्मरोग नष्ट होऊं शकतात, असा अनुभव अनेकांना आलेला आहे. इ. स. १८५७ सालीं कर्नल मेडोज टेलर या पाश्चात्य गृहस्थांनीं या कुंडांत स्नान केलें व त्यांचा हिवताप त्यामुळें हटला. कांहीं काळ तरी श्री. टेलर यांना आराम वाटला.

परक्यांनाहि आपल्यांतील गुणांची जाणीव देणारीं हीं अशीं सुरम्य स्थळें भारतांत अनेक आहेत. तीं कुठेंतरी झाडा-वनांत, एकाकी पडलीं आहेत. त्यांच्यांतील चांगल्यांचा फायदा तीं अनेकांना देत आलीं आहेत--कांहीं गाजावाजा न करतां; आपली माहिती देण्याचा प्रयत्न न करतां ! सालबर्डीचे खडक आणि हे झरे अधिक संशोधनाची वाट पहात आहेत, असें म्हटल्यावांचून रहावत नाहीं.

गरम-थंड पाण्याच्या या झऱ्याच्या बाबतींत आणखी एक अनुमान काढतां येऊं शकतें. लोककथांवरून सालबर्डीला ऋषींचे आश्रम होते हें तर अमान्य होऊंच शकत नाहीं. सीता-नहाणी-जवळ यज्ञभूमि असावी असें वाटतें. ऋषि आणि यज्ञ यांची सांगड ठरलेलीच आहे. यज्ञभूमीच्या जागीं गरम व स्फोटक

जमीन तयार होते कीं काय, नकळे! वरदातटाकीं असलेल्या कोटेश्वर स्थानीं पूर्वी अनेक यज्ञ झाल्यामुळें तेथें अजूनहि धुराचे व गरम राखेचे भपकारे जमिनींतून वर उठतात, हें सत्य आहे. येथेंहि असें कांहीं झालें नसेल असें थोडेंच आहे?

## सीतेचा गोतावळा :

सीतेमुळें धार्मिक महत्त्व आलेल्या या 'सीता-नहाणी'च्या परिसरांत सीतेचा गोतावळा नसला तरच नवल! भाविकांच्या भाविक भावनेची भूक केवळ सीतेच्या स्नान-स्थानास बघून तृप्त होणें शक्यच नाहीं. कुठेतरी मूर्ति हव्यातच! फक्त सीता असूनहि उपयोग नाहीं. सीतापति श्रीरामप्रभु आणि लक्ष्मण यांचाहि वास तेथें असायलाच हवा. सालबर्डीस सुद्धां तो आहे. सीतेची नहाणी बरीच दूर असतांना माडू नदीचें पात्र बरेंच विशाल दिसतें. या विशाल पात्राच्या पूर्वेस खडकांच्या अभंग टेकडीच्या पायथ्याशीं एक तुटलेला मोठा कडा अगदीं अलग आहे. या कड्याच्या कपारींत एक मूर्ति असून तीमध्यें वन-वासाला निघालेल्या राम-लक्ष्मण-सीतेचें नेहमीचें चित्र चित्रित करण्यांत आलेलें आहे. या राममंदिराजवळच (मंदिर कसलें? —गुहाच!) हनुमानजी सेवेसाठीं हात जोडून उभे आहेत. महादेवाची पिंडहि तेथें अंग चोरून येऊन बसली आहे. ह्या मूर्ति मूळच्या कातीव व सुरेख असून जुन्या शिल्पांत बसणाऱ्या आहेत. आतां मात्र मोर्शीच्या कोणा एका पेंटरनें त्या रंगीबेरंगी पद्धतीनें रंगवून त्यांत आधुनिक रंग भरण्याचा प्रयत्न केला आहे!

राम‌लक्ष्मणाच्या या मंदिरासमोरून पहाडामधून माडू नदी वाहते. तें मोहक व भव्य दृश्य पश्चिमेकडे पाहिलें असतां मनाला भुरळ पाडतें. तें दृश्य पहात असतांना मध्येंच खडकावर असलेल्या पादुका, गणपति व नंदी यांच्यामुळें आपलें लक्ष किंचित् काळ कां होईना त्या दृश्यावरून हालूं शकतें. तरीपण त्या विशाल पर्वत-सरिता-दृश्याचा मोह आवरला जात नाहीं!

**" महादेवीं जातों गा ऽ "**

सालबर्डीला सीता-नहाणीमुळें जसें महत्त्व आलें आहे; त्यापेक्षांहि दूरदूरच्या बहुजनसमाजांतील अज्ञ-भोळ्या जीवांना वाटणाऱ्या महादेवाच्या आकर्षणामुळें अधिक महत्त्व या स्थळाला आलें आहे. महादेव महाराष्ट्रांतील बहुजनसमाजाची महान देवता असून तिचे भक्त सर्वच समाजांत इकडे आढळतात. या भक्तांना महादेवाला जाण्याची ओढ लागलेली असते. विदर्भांतील सर्वांत मोठी महादेव-यात्रा पचमढी-महादेव डोंगरांत असली तरी भाविकांनीं या मोठ्या महादेवासारखीच लहान महादेवाचीं स्थळेंहि आपल्यासाठीं ठरवून टाकलीं आहेत. मोठ्या महादेवाला जाणें या ना त्या कारणानें सर्वांनाच नेहमीं शक्य नसतें. तेव्हां जाण्याची धडफड व मनाची तळमळ जवळच तसल्या स्थानीं जाऊन भागविली पाहिजे.

याच सद्हेतूनें सालबर्डीची लहान महादेवाची यात्रा सुरू झाली. वऱ्हाडांतील असंख्य लोक महाशिवरात्रीला या 'लहान महादेवा' च्या भेटीला येतात. महादेवाइतकी कठीण नसली तरी गिरिकड्यावरील ही यात्रा करणेंहि पूर्वीं बिकटच होतें. आतांहि ती सोपी आहेच असें निखालस म्हणतां यावयाचें नाहीं. त्यामुळेंच पायीं तीर्थयात्रेचें पुण्य घेणाऱ्या भक्तांचा 'पोहा' (यात्रा) "महादेवीं जातों गा ऽ" म्हणत निघाला कीं सर्वांना भडभडून येतें; व पुनः भेटगांठ होते किंवा नाहीं या कुशंकेनें काळीज व्यथित होऊं लागतें. डोंगरांत-केवळ डोंगरांत राहणाऱ्या महादेवाची जनतेला असलेली ही अदम्य ओढ काळानें अनेक परिवर्तनें पाहूनहि कमी झाल्याचें अजून पाहिलें नाहीं. विज्ञानयुगाला ही श्रद्धा पाहून काय वाटत असेल ?

तिकडे मोठ्या महादेवाला फुललेल्या पळस-बनांत, धेनवेच्या खोऱ्यांतून भीमसेन घाटीजवळून चढणारा 'भगतां'-चा पोहा (यात्रा) एक एक पायरी पराकाष्ठेनें पार करीत असतांना इकडेहि सालबर्डीला तोच कष्टरम्य देखावा पाहतां

येऊं शकतो. हरि–हर यांना एक मानण्याचें बाळकडू पीत आलेल्या मराठी बहुजनांचा तांडाच्या तांडा उत्तुंग गिरींवर चढण्याचा आटोकाट प्रयत्न करीत असतो. कधीं पाण्याचा घोट घेऊन हिंमत वाढवावी लागते. तोंडानें 'संभा'हि नीट म्हणणें कधींकधीं पुढेंपुढें जड जातें. मागाहून येणाऱ्या भक्तांच्या पोह्यामध्यें महादेवाच्या गाण्यांची रंगत चढलेली असते.

महादेवाच्या या भक्तांना सालबर्डी खेडें सुटून एकदीड फर्लांग गेल्यावर 'पहिली पायरी' पाहतांच हायसें वाटतें. पहिल्या पायरीवर नारळ फोडून, कापूर जाळून व शेंदूर लावून पुढें गेलें पाहिजे. कोणी सांगावें, पुढील बिकट घाट संपवून परत येणें होतें किंवा नाहीं ? आपणहून काळाच्या दाढेंत जाण्यासाठीं भक्तांची जणुं हंसतहंसत अहमहमिका चाललेली असते. घरादाराचा, पोराबाळांचा मोह सोडून महादेवाच्या भेटीला भगत निघालेले असतात. कधींकधीं कुटुंबेंच्या कुटुंबें यात्रेला जात असतात.

'पहिली पायरी 'ओलांडून भक्तमंडळी वर चढली, कीं प्रथमच लहानशा मूर्तीचें दर्शन घडतें. अखंड शिलाखंडां-वरून चढणउतरण करीत पोहा पुढें सरकतो. हा पोहा जात असतांनाच लगत माडू नदीचा खोल–अतिशय खोल–डोह



हत्ती डोहाजवळचें एक दृश्य

दिसतो. एकीकडे सपाट शिलाखंड व दुसरीकडे उंच डोंगर यांमध्यें हा सरिता-भाग असून या डोहांत मगरसुद्धां असतात.

या डोहाचें नांव हत्तीडोह आहे. कुंजर पर्वतांतील डोहहि कुंजर नामानेंच माहिती असणें साहजिक आहे. हत्तींच्या पोहण्याची जागा म्हणून हा डोह दाखविला जातो.

माडू नदीच्या कांठाकांठानें नैसर्गिक दगडांच्या अकृत्रिम पायऱ्यांनीं पुढें जात असतांना दोन्ही बाजूंचे डोंगर आपल्या विशालतेची जाणीव देत असतात. राम लक्ष्मण-मंदिराच्या पुढें गेल्यावर माडू नदी पश्चिम बाजूला वळते व गंगेच्या पूर्व-बाजूनें कठीण चढणींतून पोहा आपल्या प्रिय देवाला भेटायला निघतो. कोस दीड कोस अशीच कठीण चढण सुरू असते. हिंस्र जनावरांच्या त्या विश्वांत एकटयादुकटयानें प्रवास करणें कठीण आहे.

**महादेवाचें भव्य भुयार :**

महादेवाच्या दर्शनाला जायचें म्हणजे कुठें जायचें? कारण येथें महादेवाची मूर्ति तर कुठेंच नाहीं; आहे फक्त एक भुयार ! त्यांतहि एक पिंड आहे व तीहि अंधारांत सरपटत, उजेडाची व्यवस्था करून गेल्यास दिसते. तीवर डोंगरकडयाच्या भितींतून पाणी सारखें टपकत असतें. शंकरांना जणुं अभिषेक चाललेला असतो ! या भुयारांत जाणें म्हणजे एक महान दिव्यच आहे. तें दिव्य करायला भक्तमंडळी कचरत नाहींत. प्राणावर उदार होऊनच घर सोडल्यावर मग या भयाची तमा तरी हवी कशाला ?

एका नैसर्गिक गुहेमध्यें हें विवर ( म्हणजे भुयार ) असल्यामुळें त्याला धार्मिक महत्त्व अधिक आलें आहे. भक्ति ही सुळावरील पोळी ! धर्म आणि देव हा कांहीं खेळ नव्हे ! भक्ताच्या परीक्षेसाठीं देव अशाच कठीण जागीं थांबलेला असतो व भक्ताची वाट पहात बसतो ! हें अंतर्गत प्राकृतिक शिवमंदिर जमिनीच्या आंत आहे.

**भीमसेनाची कथा :**

हें भुयार वास्तविक टेकड्यांमध्यें तयार झालें तरी कसें याचा अंदाज आश्चर्यमुग्ध जीव घेऊं शकत नाहीं. पण त्याचेंहि उत्तर भक्तांजवळ आहेच. भक्त सांगतील "बाबा रे, भीमानें गदा मारली आणि डोंगरांत भेग पडली ! देवाची करणी मानवाला कशी साधणार ?"

अजस्त्र पहाड, भयानक भुयार आणि विवरांत कधींमधीं पहुडणारा वाघोबा यांच्याशीं जवळचें नातें असूं शकणारा बलाढ्य भीमहि या स्थानाशीं कथादृष्टचा निगडित असणें, यांत नवीन कांहींच नाहीं. अशा भव्य गोष्टींत भीमासारखा भव्य देहयष्टि व अमाप शक्ति असलेला माणूसच स्थान मिळवूं शकतो ! इतर पामरांची तिथें वर्णी लागायची नाहीं !

कोणतेंहि कठीण काम—विशेषतः खोदकाम—पांडवांनीं केलें असल्याचें जुने लोक सांगतात. त्यांतलाच प्रकार हाहि असणार ! अनेक जागच्या लेण्यांना 'पांडव लेणीं' म्हणून संबोधतात; पण वस्तुतः त्या पांडवांच्या लेण्या नसतात.

हें भुयार भीमानें तयार केलें, ही जनरूढ कथा इकडे सर्वत्र ऐकायला मिळते. भीमाला मोठ्या महादेवाचें दर्शन घेण्यासाठीं सालबर्डीहून सरळ मार्ग हवा होता. मोठा महादेव बराच दूर आणि सालबर्डी इकडे पश्चिमेस ! भीमानें आपला सरळसोट मार्ग अवलंबिला व सालबर्डीपासून महादेवापर्यंत भुयार खोदून रस्ता तयार केला ! त्यामुळें भीमाला महादेवाचें दर्शन घेणें सुलभ झालें !

येथें आणखी एक गोष्ट लक्षांत घेतली तर या कथेचें स्वारस्य आणखी वाढूं शकतें. पांडव अज्ञातवासांत असतांना सातपुड्याच्या चिखलदरा भागांत रहात होते, असें म्हटलें जातें. कीचकदरा म्हणजेच चिखलदरा असेल तर ही कथा चिखलदऱ्याला जवळ पडणाऱ्या व सातपुड्यांतच असलेल्या

सालबर्डी स्थानीं घडल्याची माहिती तितकीशी विसंगत ठरणार नाहीं.

सीतामाईचा अज्ञातवास आणि पांडवांचा अज्ञातवास एकाच सातपुड्याच्या दक्षिणारण्यांत जवळजवळच्या भागांत व्यतीत व्हावा हाहि योगायोगच म्हटला पाहिजे. अज्ञातवासासाठीं या भागाची निवड करावी, अशीच अनुकूल परिस्थिति पूर्वीपासून या भागांत असावी, असा कयासहि यापासून बांधतां येऊं शकतो. लपण्यासाठीं गिरिकंदर आणि गुहा यांचें वैपुल्य या भागांत जास्त आहे. म्हणून तात्या टोपेंनीं १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत शेवटीं शेवटीं याच सातपुडा–भागाचा आश्रय घेतला होता. सालबर्डीस जवळ पडणाऱ्या चिखलदरा, मेळघाट, मोर्शी, मूलताई या भागांत तात्या टोपेंचा संचार झाला होता व डोंगरी मुलखांत ग्रामराज्याची तात्याकृत कल्पना प्रसृत झाली होती, हें ऐतिहासिक सत्य आहे.

अगस्त्यांनीं कुदळी घेऊन इकडे मार्ग करणें व भीमसेनानेंहि भूमीखालून भुयारांतून वाट काढणें यांतहि साम्य शोधतां येऊं शकेल.

खरें पाहिलें असतां असें दिसतें कीं, ह्या कथेंतील भीमसेन गोंडांमध्यें पूज्य ठरलेलें दैवत " भिवसेन " होय. या भीमसेनानें वाघाशीं सामना देऊन आत्मबलिदान केल्याची कथा असून त्याची स्मृति पचमढी–महादेव भागांत अजून मूर्तिरूपानें आहे. तेथें भीमसेनाची टेकडीहि आहे.

**भुयारांतील बकऱ्या :**

या भुयाराबद्दल आणखी अशीहि माहिती या भागांत सगळीकडे दिली जाते कीं, हें भुयार पचमढीजवळील महादेव डोंगरापासून सालबर्डीपर्यंत लांब आहे. अशीं भुयारें पूर्वीं लांबवर नेलीं जात असत व त्यांचा उपयोग गुप्त तऱ्हेनें स्वाऱ्या

करणें, सैन्य पोहोंचविणें इत्यादि कामांसाठीं करीत असत. अशी कथा आहे कीं, श्रीशिवशंकरानें महादेवाच्या डोंगरगुहेंतून या मार्गानें दोन हजार मेंढ्या–बकऱ्या आणि मेंढे व बकरे सोडले. त्यांपैकीं फक्त एकच बकरा सालबर्डीस या भुयारापाशीं येऊन निघाला.

बकरा हा गोंडकोरकूंचा आवडता बळी असूनहि या जागीं ही गोष्ट करण्यास मनाई असणारी धर्ममान्य रीत गोंडांनीं व अन्यजनांनीं आपणांवर लादून घेतली आहे. कदाचित् बलिदान-बंदीसाठींच ही शंकराच्या बकऱ्यांची कथा तयार करण्यांत आली असावी. धर्मकथेचें अधिष्ठान असलें कीं त्या कथेंतून अनुस्यूत होणाऱ्या तत्त्वांचा पगडा लोकमनावर लवकर बसूं शकतो.


सालबर्डीचें भुयार खरोखरीच किती लांब आहे, हें सांगतां येत नसलें, तरी तें बरेंच लांब असावें यासाठीं उपोद्बलक अशा कथा या भागांत रूढ आहेत.

सालबर्डीहून २०–२५ मैल लांब असलेल्या पट्टण या मूलताई तालुक्यांतील गांवाकांठीं झिरी नांवाचें एक निसर्गरम्य धबधब्याचें स्थान आहे. येथें सुमारें ३०–४० फुटांवरून पाणी खालीं कोसळतें. पाणी कोसळण्याच्या जागीं एक खोल खड्डा पडला असून त्या जागीं भुयार असल्याचें पट्टणवासी लोक सांगतात. इतकेंच नव्हे तर, त्या भुयारांतून कांहीं बकऱ्या सोडल्या असतांना त्यांपैकीं फक्त एक बकरी सालबर्डीला पोहोंचली, म्हणतात !

अशीच एक कथा टेंभुरखेडा गांवाजवळील भिवकुंड स्थानाचीहि आहे. या 'भीमकुंडा'तूनहि सालबर्डीहून सोडलेल्या बकऱ्यांपैकीं फक्त एक-दोनच निघाल्याचें सांगतात. भिवकुंड सालबर्डीहून ११ मैल येईल. तेव्हां, सालबर्डीच्या या भुयाराशीं संबंधित असलेल्या ह्या कथा केवळ भाकडकथा म्हणून दुर्लक्षिण्यासारख्या वाटत नाहींत.

## योगिनी मुक्ताबाईचा योगाश्रम :

'तातोबाची मढी' म्हणून जें देऊळ सीतेच्या नहाणीजवळ आहे, तें प्राचीन शिल्पाचा एक नमुना म्हणून दाखवावें लागेल. हेमाडपंती देवळाप्रमाणें शिलाखंडावर उंच टेकडीलगत असलेलें हें विशाल मंदिर अलीकडे पडतखचत चाललेलें दिसतें. या मंदिराला चुना-सनला वगैरे न वापरतां दगडावर त्याची रचना केली आहे. बुद्धविहारावरील भिंती जशा चित्रविचित्र मूर्तींनीं सजविलेल्या असतात, तसेंच येथेंहि दिसतें.



तातोबाची मढी

या देवळाच्या पायऱ्या चढून वर गेल्यावर खांबांमधील आंतल्या भागांत एक समाधि दिसते. या समाधीपाशीं म्हणे, एकदां एक भुकेला वाघ आला आणि त्यानें माणूस मारण्याची आज्ञा मागितली. ती देवानें दिली नाहीं. वाघ निघून गेला. ही कथा अहिंसेचें आणि बळीप्रथेच्या निषेधाचें प्रतीक आहे. त्या वाघाचीं पावलें मागाहून कुणी तरी सिमेंटांत उमटवून तीं भाविकांना दाखविण्याची सोय केली आहे !

समाधीच्या आंत एक गाभारा आहे. त्यांत एक लिंग आहे. विशेष मूर्ति नाहींत. मूर्तींपेक्षा देवळाचें शिल्पच प्राचीन आणि भव्योदात्त आहे. अशा वैराण जागीं राहणारे लोक योगीमुनीच असणार.

आणि आहेहि तसेंच. ज्यावेळीं ज्ञानेश्वरांची बहीण मुक्ताबाई हिचा जन्महि झाला नव्हता, तेव्हां सालबर्डीच्या या निर्जन अरण्यांत मुक्ताबाई नांवाची योगिनी तपश्चर्या करीत बसली होती. तिचा येथें एक आश्रम होता. तातोबाची मढी म्हणजेच तिचें आश्रमस्थान होय. त्या महत्तर मुक्त महिलेचा केशकलाप लांबसडक आणि प्रसारित असा होता. तिच्या नखांच्या चुंभळी वळलेल्या होत्या. ह्या योगिनीनें अनेक वर्षें तपश्चर्या करून या रानवट भागाला पावित्र्य प्राप्त करून दिलें आणि त्या भागांतील उपेक्षितांच्याच नव्हे, तर मोठमोठ्या महात्म्यांच्या व साधकांच्या श्रद्धेचें केंद्रहि ती बनली. या महा-योगिनीच्या नम्र, ऋजु आणि तपोनिष्ठ स्वभावानें त्याकाळीं सारें रान भरून आणि भारून गेलें होतें.

वा. क्र. 99803

**श्रीचक्रधरांची तपोभूमि :**

समाजसुधारक चक्रधरस्वामींच्या चरणकमलांनीहि सालबर्डीची भूमि पावन झाली आहे. महानुभाव पंथाची स्थापना करण्यापूर्वी चक्रधर साधक होते. गोविंदप्रभूंचा ऋद्धिपूर येथें उपदेश घेतल्यानंतर चक्रधर अलमस्त अवस्थेंत भटकूं लागले. अंगाला काटे ओरखाडे देत होते. अंगावरील कपडे फाटत होते. अंग रक्तबंबाळ होत होतें. तरी ते हिंडतच राहिले !

असेच ते संचार करीत करीत ऋद्धिपूरकडून ईशान्येकडे गेले व सालबर्डीच्या डोंगरावर स्थिरावले. अनंत आकाश, गर्द वनराई आणि अमाप एकान्त यांमुळें चक्रधरांच्या पायाची भिंगरी खंडली व त्यांची भटकन्ती एक तपासाठीं येथेंच थांबली.

जगासाठीं विषप्राशन करणाऱ्या आणि एकान्तिक स्मशानवास पत्करणाऱ्या शंकरांच्या त्या प्रसन्न भूमींत चक्रधरांनीं तपश्चर्या सुरू केली. हें तप बारा वर्षें निष्ठेनें चालू होतें.

बारा वर्षांनंतर जगत्कल्याणासाठीं सत्य, अहिंसा आणि समता या तत्त्वांचा साक्षात्कारी संदेश घेऊन चक्रधर सालबर्डी सोडून निघाले.

योगिनी मुक्ताबाई एकदा चक्रधरांना आपल्या आश्रमांत घेऊन आली. तिनें त्यांची वनपुष्पांनीं पूजा केली. कंदमुळें यांचें भोजन दिलें. तिला कृतकृत्य वाटलें. ती धन्यतेनें उद्गारली, " प्रभो ! आजवर मीं इतकें तप केलें, त्याचें पूर्ण फळ मला आज मिळालें. मी धन्य झालें ! "

चक्रधरांच्या वास्तव्यामुळें महानुभाव पंथाला सालबर्डी स्थान पूज्य आणि पवित्र ठरलें. सालबर्डीला महानुभावांचें एक मंदिर असून तें एका बुद्धविहारावर टेकडीच्या टोकावर आहे. त्याला मुनिराजबुवांचें मंदिर म्हणून संबोधतात. मुक्ताईचें मंदिर ऊर्फ तातोबाची मढीहि महानुभाव आस्थेनें जाऊन पहातात. महानुभाव-उपदेशी लोकांची आवकजावक सालबर्डीला मधूनमधून असते.

### बुद्धविहार :

अगदीं मणिराजबुवाच्या मठाखालींच टेकडी कोरून केलेला एक बुद्धविहार आहे. तसाच आणखी एक बुद्धविहार जवळच असून दोन्हींचें संशोधन रा० ब० हिरालाल ह्यांनीं केलें आहे. दोन्ही विहारांत मोठमोठे दिवाणखाने असून कांहींत दोनतीनशें लोक सहज बसूं शकतात. विहारांत बाजूंना सुंदर खोल्या आहेत. खोल्या आणि दिवाणखाने यांची रचना नैसर्गिक अशी, खडक कोरून केलेली आहे.

मणिराज-मठाखालचा विहार इतिहासदृष्टया महत्त्वाचा आहे. या मठांत बुद्धाची खंडित मूर्ति आहे. मूर्तीचें शिर तुटलेलें आहे. समोर एक सभागृह; बाजूंना दोन खिडक्या व मागें गाभारा अशी या विहाराची रचना आहे. बाजूच्या खोल्यांचे खांबहि

तुटले आहेत. एक खांब थोडा शाबूत आहे. विहार जुना असून तो बराच काळ अज्ञात असा होता. जेथून या विहाराला आंत जावें लागतें, तेथें मोठमोठे दगड व खडक होते. त्यामुळें त्याची दर्शनी बाजू दबली होती. येथें कांहीं असेल याची कल्पनाहि तेव्हां येत नव्हती. फक्त टेकडीला वरून एक छिद्र होतें. त्यांतून उडया टाकून आंत अंधाऱ्या भागांत प्रविष्ट व्हावें लागे. हा भाग दरवडेखोरांनीं खुला केला अशी कांहीं जणांची समजूत आहे. येथील अंधारामुळें कांहीं दरवडेखोर या जागेचा पूर्वीं आश्रय घेत असतील, एवढाच याचा अर्थ. बुद्धविहारसुद्धां अशा एकान्त व कठीण जागीं बांधण्यामध्यें आधीं साधना हा उद्देश असला तरी नंतर संरक्षणहेतु त्यांत शिरलाच !

या वैशिष्टयपूर्ण लेण्यांत पूर्वीं वरून लहानशा झरोक्यांतून उडया टाकून अंधारांत आंत जावें लागत असल्यामुळें साहजिकच मुख्य मूर्तीचें दर्शन नीट घेतां येत नव्हतें. त्यामुळें बुद्धमूर्तीला लोक देवीच समजत असत. अजूनहि देवीचें देऊळ म्हणूनच या लेण्याचा उल्लेख करतात व त्या देवळाचा दर्शनी भाग कमान-दरवाजा म्हणून ओळखला जातो. लोक देवी म्हणून मूर्तीची पाणी, दहींदूध, व हळद इ. उपचारांनीं पूजा करतात.

संस्कृतीचें प्रचारकेंद्र म्हणून सालबर्डीचा उपयोग हिंदु मिशनरी, आर्यधर्मी, जैन, महानुभाव, बुद्ध, मुसलमान, आदिवासी, बहुजनसमाज इत्यादिकांनीं करून घेतल्याचें दिसतें. सर्वधर्मसमन्वयाचा पाठ देणारा हा गिरी निर्जनस्थानीं आपलें कार्य संथपणें करीत राहिला, हेंहि एक आश्चर्यच म्हटलें पाहिजे.

## मामानें भाच्याचा वध केला :

येथील केवळ धड असलेल्या मूर्तीला बघून भाविकांची पुन्हां एक कथा तयार झाली. प्रत्यक्ष मामानेंच म्हणे भाच्याचें शिर कापून नेलें ! मामाभाच्याची लढाई झाली. तींत भाचा बिचारा

पराजित झाला. भाच्याचें शिर कापून मामा निघाला. रत्स्यानें रक्त शिंपीत मामा टपटप टापांचा आवाज करणारा घोडा उडवीत सालबर्डी गांवाच्या रोखानें पार निघून गेला ! जातांना त्याच्या घोड्यांच्या टापांच्या खुणा खडकांवरहि उमटल्या ! त्या अजूनहि दाखविल्या जातात. त्या दूरवर पसरल्या आहेत. ह्या टापांच्या खुणा पूर्वी लहान असल्या तरी भाविकांनीं मोठ्या केल्या आहेत. कदाचित् ह्या टापांचे खड्डे यात्रेकरूंनीं निसरडीवरून घसरूं नये म्हणून, पाय बरोबर रुतवितां यावेत म्हणून केल्या असाव्यात.

मध्यकाळांत मुसलमान आणि एतद्देशीय यांच्या झटापटींच्या वेळीं संरक्षणस्थळ म्हणून सालबर्डीचा उपयोग केला गेला, त्यावेळीं कदाचित् येथून घोड्यांची आवक जावक जास्त होत असावी. म्हणूनहि ही कथा तयार करण्यास मदत झाली असावी. या लेण्यास 'घोडपागा' म्हणूनहि लोक दाखवितात. कदाचित् जवळपास घोड्याची पागा असणें शक्य आहे. जवळच थोडें मैदानी पठार आहे.

एवढ्यांतच येथें खालीं पाणी असलेला लालरंगी पूल आहे. तो लाल कां ?--तर भाच्याचें शिर मामानें उडविलें, त्यावेळीं त्याचें रक्त सांडलें म्हणून ! त्यामुळें सर्व भूमि लालीलाल झाली ! त्या मूर्तीच्या शरिरांतून भळाभळा वाहणाऱ्या रक्तानें सर्व कांहीं जणुं रक्तिम झालें आणि त्याची स्मृति अजूनहि वातावरणानें कायम राखली आहे.

मामाभाच्याच्या या लढाईची कथा तयार करणाऱ्यांनींहि हिंदुमुस्लीम ऐक्यसाधनाची जणुं पुनश्च जाणीव करून दिली. मामा म्हणजे आईचा भाऊ. नातें अगदीं जवळचें; तरीहि त्याला प्रत्यक्ष भाच्याच्या वधाची कल्पना यावी ना ? ज्यांनीं जवळ जवळ राहून गोडीगुलाबीनें नांदायला हवें, त्या नातेवाईकासारख्या मुसलमानांनीं हिंदूंच्या मूर्तीची अशी वासलात लावावी हें दुर्दैवच ! मुसलमानांनीं अशा अनेक मूर्तींचीं शिरें

उडविल्याचें इतिहास सांगतो. हीहि मूर्ति तशीच खंडित झाली, हें काय सांगायला हवें ?

पण त्या मूळ विद्वेष-कथेला पारंपरिक रूप देऊन ती सांगितली जाण्यांतहि हिंदु संस्कृतीच्या सहिष्णु धोरणाचें व नितळ मनाचें प्रतिबिंब उमटलें आहे, असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

मामाभाच्याच्या या लढाईची, विशेषत: मामानेंच अबोध व सुकुमार भाच्याचा वध करावा ह्या गोष्टीची कमालीची छाप दर्शनाला येणाऱ्या भोळ्याभाबड्या जनमनावर आहे. अनेक यात्रेकरू या मूर्तीला अक्षरश: अश्रूंनीं भिजवितात. तें दृश्य पाहणाऱ्या सुसंस्कृत सुशिक्षितालाहि कांहीं क्षण कळवळून येतें. भावना भावनेला मिळते आणि हृदय-संवाद सुरू होतो.

## बाबूखानाचा किल्ला :

मोगलकाळांत सालबर्डी भाग मुसलमानी अंमलाखालीं आला. तेथें त्यांचे तळ पडले. संरक्षक सैन्यें ठेवण्यासाठीं अशीं स्थळें उपयुक्त ठरतात. त्या दृष्टीनें पाहिल्यास, येथील किल्ला त्यावेळीं उपयोगांत असला पाहिजे. कदाचित् तो त्याच काळाच्या आगेंमागें बांधण्यांत आला असावा. वस्तुत: नैसर्गिक आणि उंच टेकडीचा फायदा घेऊन, डागडुजी करून किल्ल्याचें स्वरूप टेकडीला दिलें असणें अधिक शक्य आहे.

हा किल्ला खडबडीत दगडांचा असून उंच जागीं आहे. तो अजूनहि बऱ्याच चांगल्या अवस्थेंत आहे. हा किल्ला एके काळीं पेंढाऱ्यांच्या ताब्यांत होता. पेंढाऱ्यांचीं सर्व सूत्रें येथून हालत असत. या किल्ल्याचा उपयोग दरवडेखोरांनीं केल्याच्या कथा प्रचलित आहेत.

या किल्ल्याच्या पायऱ्या, बांकासारखा ओटा व एक इमारत इतक्या गोष्टी अजून शाबूत आहेत.

या किल्ल्यांत लाख्या झोर नांवाचा डाकू आश्रयाला होता अशी दंतकथा आहे. लपण्यासाठीं उत्कृष्ट स्थळें म्हणून येथील स्थानांचा लौकिक आहे.

'भोरकपार' म्हणजे हा किल्ला किंवा किल्ल्यांतील तो दिवाणखाना असावा. भोरकपारींत बरींच माणसें बसूं शकतात, असें लोक सांगतात.

या किल्ल्याच्या आसपास दगडाविटांच्या कांहीं बांधीव पाळी असून त्या आतां जवळजवळ नामशेष होत आहेत. किल्ल्याच्या परिसरांतील भिन्न भिन्न विभागांचा वापर करण्यासाठीं अशा तऱ्हेच्या जागा तयार केल्या असाव्यात. कांहीं जागीं घरें असावींत व कांहीं जागांचा उपयोग पाणी वगैरे सांठविण्यासाठीं करण्यांत येत असावा.

**ढोलंगशहाचा बीचमें चांद :**

हिंदूंच्या पवित्र स्थानांच्या लगतच आपले चांद मधेंमधें मिरविण्याचें धोरण पूर्वींपासून मुस्लीम साधूंनीं राजाश्रयाच्या पाठबळावर ठेविलें होतें. विशेष हें कीं, या धोरणाला सहिष्णु हिंदु धर्मानें कधीं विरोध केला नाहीं. सालबर्डीलाहि असा प्रकार झाला आहे.

सालबर्डी येथें कधींतरी ढोलंगशहा नांवाच्या फकिरानें दूर रानांत एका पहाडावर आपलें बस्तान मांडलें. एका उंच डोंगरावर तें बरेच दिवस राहिलें. तेथें सध्यां एक थडगेंवजा स्थान असलें तरी तें पाहण्याला फारसें कुणी जात नाहीं.

दूरपणाची ही अडचण जाणून कुणा आडदांड पीरभक्तानें ढोलंगशहाच्या त्या स्थानाची दुसरी प्रतिकृति सीता-नहाणीच्या वरच्या सपाट भागावर तयार केली. एका कड्याशेजारीं एक इदगा तयार केला व हिरवा कपडा त्यावर पसरून दिला ! हा इदगा ठीक तातोबाच्या मढीच्या समोरासमोर येतो.

आमच्या हिंदु भाविकांची श्रद्धा त्या थडग्यालाहि नमन करते आणि आपल्या सर्वप्रेमी स्वभावाची व उदार धोरणाची चुणूक दाखवून देते.

मुसलमानांना मिळणाऱ्या अधिक सवलतींच्या काळांतील ह्या खाणाखुणा आहेत. आजहि सालबर्डीची पाटीलकी परंपरेनें मुसलमानाकडेच आहे. या गांवांत त्या मानानें मुसलमानांचीं घरेंहि अधिक आहेत.

कोणा एका मुसलमान पाटलानें हिंदूंच्या एका देवीला चीत करून टाकलें ! ती बिचारी तशीच तेथें पडली आहे. ही देवी भवानी पूर्वभागांतील एका टेकडीवर असून तेथेंच फक्त बळी वगैरे देण्याची सोय आहे. कदाचित् ह्या देवीची निर्मिति मांसाहारी लोकांनीं आपल्या सोयीसाठीं करून घेतली असावी. श्रद्धाळूंच्या त्या वर्गाची सोय त्यामुळें झाली इतकें तर खरेंच.

पाण्याच्या पाटाजवळ असेंच एक अंबादेवीचें स्थान आहे. देवी भवानी व अंबादेवी यांनाहि सालबर्डीस विश्राम घ्यावासा वाटावा, यांत सालबर्डीच्या नितान्तरम्यतेची प्रशस्तीच आहे, नव्हे का ?

## देवांगणांतील आणखी कांहीं देवता :

महादेवीं जाणाऱ्या असंख्य भक्तांना महादेवाचा परिसर हा ‘भवन’ वाटतो. त्या भवनास ‘देवांगण’हि म्हणतात. सालबर्डी बोलूनचालून लहान महादेवच ! तेथेंहि ‘देवांगण’ आणि ‘भवन’ असल्याशिवाय कसें राहील ?

या ठिकाणीं सर्वत्र निसर्गरम्यतेला उधाण आल्यामुळें जागजागीं देवदेवतांच्या स्थापनेच्या मानवी मनोवृत्तीलाहि बहर आलेला आहे. ही वृत्ति आजची नाहींच; अनेक शतकांपासून हें चालत आलेलें आहे.

अशाच वृत्तींतून निर्माण झालेल्या कांहीं मूर्तींचा उल्लेख आवश्यक आहे.

पश्चिमेच्या बाजूला माडू नदीच्या तीरावरील उंच कड्यावर एक ‘ कालिदास ’ आहे. कोणी म्हणतात ही काली आहे; तर कोणाला वाटतें, हा कालीचा दास आहे. या कालिदासाला लोक मृत्यूची देवता मानतात. पूर्वीच्या काळीं या कालिदासाच्या मूर्तीजवळून पारस्परिक भांडणांमध्यें शत्रुपक्षाकडील लोकांना खालीं ढकलून दिलें जाई, असें सांगितलें जातें. एवढें मात्र खरें कीं, हा कडा अतिशय उंच असून त्यावरून खालीं कोसळणारा वांचूंच शकत नाहीं. त्याच्या चिंधड्या चिंधड्या उडून गंगेला अर्पण झाल्यावांचून राहणार नाहींत.

या स्थानाबद्दल दुसरीहि माहिती कांहींशी प्रचारांत आहे. जैनपंथांत निर्वाणाला फार महत्त्व आहे. आत्मार्पणाचें महत्त्व त्या पंथाला अधिक अवगत आहे. त्यांच्या दृष्टीनें स्वतःचा नाश स्वतःच करून घेणें म्हणजे मोक्षाप्रत जाणें. या पंथांतील कांहीं लोकांनीं येथून मरु गंगेंत उड्या घेऊन प्राणत्याग केल्याचें सांगण्यांत येतें. या दृष्टीनें बघितल्यास जैन मुनींच्या रक्तिम त्यागानेंहि सालबर्डी-स्थान पुनीत झालेलें आहे, हें ध्यानांत येतें व या त्यागभूमीच्या नित्यलौकिकांत आणखी भर पडते.

तातोबाच्या मढीच्या अलीकडेच एका टेकडीवर तुटलेल्या खडकाच्या कमानीवजा कपारींत गणेशाची व भुजंगाची मूर्ति असून एक शिवपिंड आहे. खडकाच्या कमानीच्या मानानें मूर्ति गौण आहेत. मात्र खडकाची कमान पहात रहावी अशीच कमनीय आहे.

वस्तुतः या कमानीच्या पुढें ५–१५ फुटांवर असलेला एक तुटक खडक उभा केल्यासारखा दिसत असून तोच खरें म्हणजे भव्य भुजंगासारखा दिसतो. त्याची ओबडधोबड रचना दुरून तरी विशालकाय नागाच्या विशाल फण्यासारखी दिसते.

याशिवाय जनसमूहाला आकर्षण नसलेल्या पण रसिकांच्या कौतुकास पात्र ठरणाऱ्या अशा आणखी तीन मूर्ति एका जागीं आढळतात. ह्या मूर्तींचें शिल्प बौद्धविहारावरील किंवा दक्षिणेकडील पुरातन मंदिरांवरील शिल्पांसारखें आहे. हीं चित्रें कलात्मक व कोरीव वाटतात.

## तुकडोजी महाराजांचा यज्ञ :

ऋषींचें जीवन आणि आश्रम पाहिलेल्या व अनेक संतमहंतांनीं पुनीत केलेल्या या भूमीनें आधुनिक काळांतहि संतपदांचें दर्शन घेऊन स्वतःच्या पवित्रतेंत भर घालून घेतली आहे.

नुकतीच पंचविशी उलटत असतांना तुकडोजी महाराजांनीं विदर्भप्रसिद्ध असा भव्य यज्ञ १९३५ सालीं सालबर्डी येथें केला. या यज्ञांत एक लक्षावर जेवणावळी उठल्या, हजारों कार्यकर्ते राबले व शेकड्यांनीं समित्या कार्यरत राहिल्या. या यज्ञासाठीं लोकांनीं अनाहूत पैसे, धान्य, सर्पण आदि वस्तु पाठविल्या. वेळेवर अनेक पखालींनीं पाण्याची व्यवस्था केली होती. या कार्यक्रमाला श्रीगाडगे महाराज, श्रीमुंगसाजी महाराज इत्यादि ख्यातनाम संत आले होते.

या कार्याचा समग्र इतिहास एका पुस्तिकेंत छापला आहे. या वेळेपासून तुकडोजींनीं आपल्या समाजसुधारणेच्या कार्याला सामुदायिक रूप दिलें. या यज्ञकार्याच्या यशस्वितेची कीर्ति ऐकूनच महात्मा गांधींनीं तुकडोजी महाराजांना सेवाग्राम येथें बोलावून एक महिना ठेवून घेतलें.

## आजकालची सालबर्डी :

सालबर्डीचीं वरील सर्व वर्णनें असलेल्या डोंगरांच्या अलीकडे सालबर्डी नांवाचें एक खेडें माडू नदीच्या कांठीं वसलें आहे. माडू हें नदीचें नांव माडांवरून पडलें कीं काय, नकळे !

उंच पर्वतास माड म्हणण्याची वहिवाट आहे. परंतु मरु म्हणजे रेती, या अर्थानेंच हें नांव प्रचारांत आलें असावें. मरु हेंच मूळ नांव असावें. सालबर्डीच्या आसपासचा भाग खडेगोटे असलेला—वालुकामय—आहेच.

या भागांत गोंड-कोरकूंची वस्ती आहे. गोंडांतील एक शाखा 'माडे' किंवा 'मारिया' नांवानें प्रसिद्ध आहे. मरु वा माडू या नांवाशीं त्यांचा तर संबंध नसेल ना ?

सालबर्डी हें नांव जुनें असावें. सालवृक्षांचा उल्लेख रामायणांत आहे. चित्रकूटावर भरत ससैन्य येत आहे असें पाहून लक्ष्मणानें सालवृक्षावर चढून लढण्याची तयारी दर्शविली होती. सालबर्डीच्या डोंगरांत सालवृक्षांची पैदास फार मोठ्या प्रमाणांत होते. या भागाचें तें वैशिष्ट्य आहे. सालवृक्षांच्या वैपुल्यामुळें सालबर्डी नांवास जशी पुष्टि मिळते, तशीच 'बर्डी' नांवाचीहि गोष्ट सांगतां येऊं शकते. 'बर्डी' या शब्दाचा अर्थ मुरमाड जमीन असा असून 'बरड' याचा अर्थ डोंगर असा जन-भाषेंत आहे. हें लक्षांत घेतल्यास सालवृक्ष आणि बरडखरड असलेल्या गांवाला सालबर्डी हें अन्वर्थक नांव देण्यांत औचित्य साधलें आहे, यांत शंका नाहीं,

सालबर्डीच्या खडकाळ भागाला आधुनिक दृष्टीनेंहि आगळें वैशिष्ट्य आहे. राम-लक्ष्मण मंदिराच्या पुढें भुजंगाच्या कमानीजवळ कुंकवाची खाण आहे. येथील खडकांतून कुंकवाची पैदास भरपूर प्रमाणांत होऊं शकते. तसे प्रयत्नहि झाले आहेत. अधिकृत संशोधन-प्रयत्नांची आणखी आवश्यकता आहे.

जवळच खरपाच्या दगडाच्या टेकड्या आहेत. या भागांतील दगड खरपीच आहे. खरपाचे अनेक उपयोग होतात. खरपावर शस्त्रें पाजवितात. खरपांच्या दगडांच्या विविध वस्तु बनविण्याचा धंदा सालबर्डीला केला जातो. खाणींतून हा दगड काढला जातो आणि त्याचे पारीस, गरिबांना वापरत

येण्याजोगीं पसरट दगडी भांडीं, दगडचा, पेले, कप आणि उखळें केलीं जातात.

वाहनें टेकडीपर्यंत चढत नाहींत; राममंदिरापर्यंत फार तर पोहोंचूं शकतात. त्यामुळें खाणी वगैरेंचें काम फारसें वाढायला वाव दिसत नाहीं.

गरम व थंड पाण्याचे झरे ज्या द्रव्यांमुळें या टेकड्यां-मधून स्फुरूं शकतात त्या कारणांचा शोध घेतला, कुंकवाचा व्यापार वाढविला, येथला पारीस दगड आणखी उपयोगाला आणला आणि चुनखडीचा धंदा विकसित केला गेला तर सालबर्डी एक खाण-केंद्र व उद्योग-केंद्र म्हणून प्रसिद्धीला येऊं शकेल आणि आधुनिक तीर्थक्षेत्र म्हणविलें जाईल.

## सालबर्डीची यात्रा :

विदर्भांतील मोठ्या यात्रांमध्यें सालबर्डी यात्रेचा समावेश होतो. सालबर्डीला महाशिवरात्रीस म्हणजे फेब्रुवारी-मार्च महिन्याच्या दरम्यान फार मोठी यात्रा भरते. या यात्रेस पन्नास हजारांहून अधिक लोक जमतात. तीनचार दिवस ही यात्रा जोरदारपणें चालते. त्यावेळीं दोनचार कोसांचें हें रान कसें फुलून निघतें.

ही यात्रा भरली असतांना एक मजेदार दृश्य दिसतें, तेव्हां मानवकृत कृत्रिमतेचें हंसूं येतें. सालबर्डी हें गांव अंशत: मध्यप्रदेशाच्या बैतूल जिल्ह्यांतील मूलताई तहसिलींत मोडतें, तर अंशत: अमरावती जिल्ह्यांतील मोर्शी तालुक्यांत मोडतें. तसें पाहिलें तर निसर्गरचनेप्रमाणें सालबर्डीसकट सातपुड्याचा दक्षिणभाग विदर्भांतच मोडतो. फक्त सात-आठ फुटांचा एक निमुळता रस्ता पूर्वपश्चिम सरकत गेला आहे. या पट्ट्याच्या उत्तरेकडे मध्यप्रदेश व दक्षिणेकडे मराठी मुलूख ! सारें देवांगण उत्तरेस डोंगरावर असलें तरी येथें जाणारे बहुतेक

लोक मराठी भागांतील असतात. सुधारणाहि विदर्भाच्या बऱ्याच आहेत. रस्त्याच्या दक्षिणेकडे महाराष्ट्राची व उत्तरेकडे मध्यप्रदेशाची यात्रा भरते.

सालबर्डीस जाण्यासाठीं अमरावती ते मूलताई-हुशंगाबाद-बैतुलमार्गे मोटार सडकेनें जावें लागतें. अमरावतीहून मोर्शी ३४ मैल आहे. नेहमींच्या मोटारी येथवर चालतात. यात्रेच्या वेळीं सालबर्डीसाठीं खास व थेट मोटार गाड्या सुटतात.

मोर्शीच्या उत्तर-ईशान्य भागीं ५ मैलांवर सालबर्डी असून मोर्शीकांठची नळ नदी सोडतांच उत्तरेकडे एक सड्क जाते. ३ मैलांवर पाळा नांवाचें गांव असून २ मैल सडक चांगली आहे. नंतर ती ओबडधोबड झाली आहे. पाळ्याला गढी आहे. येथें बारा हनुमंत होते अशी कथा आहे; आतां फक्त एकदोनच दिसतात.

पाळ्यापासून मात्र बरडभाग असून दगडधोंड्यांतून जाणाऱ्या पांदणींतून मार्गक्रमण करावें लागतें. अशा तऱ्हेचा रस्ता २ मैल आहे. सालबर्डी गांव आलें कीं सातपुड्याच्या गिरिमाला उंचावतात व आपल्या स्पष्टतेची जाणीव देतात. गांवालगत पोहोंचतांच माडू नदीचें पात्र लागतें व तें पार करून मध्यप्रदेश-महाराष्ट्र राज्यांना दुभंग करणाऱ्या वाटेनें यात्रेला उजव्याडाव्या बगलेंत घालून पुढें जावें लागतें.

* * *

क्र. नं. ११४०३
REFBK-0011403



वोरा ॲण्ड कंपनी पब्लि. प्रा. लि.
मुंबई.